CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मराठा आरक्षण आंदोलनाबाबत १६ मे रोजी महत्त्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

मराठा आरक्षण आंदोलनाच्या पुढील दिशेबाबत चर्चा करण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आंतरवाली सराटी येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही बैठक शुक्रवार दि. १६ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता पार पडणार असून आंदोलनाची पुढील दिशा, संघटनात्मक बांधणी तसेच मराठा समाजाच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

मराठा क्रांती ठोक मोर्चाचे राज्य समन्वयक सज्जन भाऊ साळुंखे यांनी तुळजापूर तालुका व शहरातील सर्व मराठा बांधवांना बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

मराठा समाजाच्या हक्कासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला अधिक बळ देण्यासाठी प्रत्येक समाजबांधवाने एकजुटीने सहभागी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मराठ्यांचा स्वाभिमान, हक्क आणि न्यायासाठी सुरू असलेल्या लढ्यात समाजाने सक्रिय सहभाग नोंदवावा. ही बैठक आगामी आंदोलनासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार असून युवक, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्व स्तरातील समाजबांधवांनी उपस्थित राहून ऐक्याचे दर्शन घडवावे, असेही साळुंखे यांनी म्हटले आहे.



# हरीत धाराशिव २०२५ वृक्षलागवडीत भ्रष्टाचाराचा आरोप

### नळदुर्ग नगरपालिकेतील कामांची चौकशी करण्याची मागणी....

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ मे -**

नळदुर्ग नगर परिषदेमध्ये हरीत धाराशिव २०२५ अंतर्गत करण्यात आलेल्या वृक्षलागवड कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे.

मारुती सुदाम खारवे, सुधीर बाबुराव पोतदार आणि आकाश दिलीपराव कुलकर्णी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीमध्ये तत्कालीन मुख्याधिकारी, संबंधित विभाग प्रमुख, लेखापाल तसेच संबंधित नर्सरी ठेकेदार यांनी संगनमताने शासन निधीचा अपव्यय केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार हरीत धाराशिव अभियानांतर्गत सुमारे ३० हजार वृक्ष लागवडीचे काम करण्यात आल्याचे दाखवण्यात आले असले तरी प्रत्यक्षात अनेक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. निविदा प्रक्रिया नियमबाह्य राबविणे, एका व्यक्तीस विविध प्रकारची कामे देणे, वाहतूक व मजूर खर्च फुगवून दाखवणे, शासकीय रोपे मोफत उपलब्ध असतानाही खाजगी खर्च दाखवणे तसेच बनावट मजूर नोंदीद्वारे आर्थिक अपहार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

त्याचबरोबर काळी माती वाहतूक, ट्रॅक्टर फेऱ्या, जेसीबी आणि मजूर पुरवठा यांसंबंधीच्या बिलांमध्ये मोठी तफावत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. माहिती अधिकारांतर्गत खोटी माहिती देण्यात आल्याचाही दावा तक्रारदारांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी व पंचनाम्याद्वारे सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अनेक वेळा लेखी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने विभागीय आयुक्तांमार्फत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, संबंधित अधिकाऱ्यांना




निलंबित करावे तसेच नगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान दोषींकडून वसूल करावे, अशी मागणी संबंधित नगरसेवकांनी केली आहे.

## सौर प्रकल्पातील तांब्याची तार चोरी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

कोडगाव येथील सौर प्रकल्पातून अंदाजे ७० हजार रुपये किमतीची तांब्याची तार अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते दि. १५ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत तसेच दि.२५ एप्रिल रोजी पहाटे ४.२६ वाजल्यापासून दि.२६ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरीची घटना घडली. कोडगाव ता. जि. धाराशिव येथील महाजन्को व भेज




कंपनी प्रा. लि.च्या आरआर-१० या लोकेशनवरील ६ एसएमबी व ११ एसएमबी सौर पॅनलला जोडलेली ४ स्केअर मिमीची सुमारे ३४ किलोमीटर लांबीची तांब्याची तार अज्ञात व्यक्तीने चोरी करून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी फिर्यादी सागर मोहन येलगुंटवार, रा. मोढा ता. हिंगणा जि. नागपूर यांनी दि.१२ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरवरून धाराशिव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## कांद्याच्या दरघसरणीने शेतकरी संकटात; अवकाळी पावसाने वाढल्या अडचणी




**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१३ मे -**

कांद्याच्या दरात मोठी घसरण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. लाखो रुपये खर्च करून पिकवलेला कांदा आज कवडीमोल दराने विकला जात असून अनेक ठिकाणी कांदा शेतामध्येच सडून जाऊ लागला आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यावर एकामागून एक संकटांचा डोंगर कोसळत असून दि. १३ मे रोजी विजांच्या कडकडाटासह झालेल्या अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कमी दरामुळे कांद्याची विक्री न करता तो शेतामध्येच मोठ्या प्रमाणात साठवून ठेवला होता.

मात्र अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी कांदा भिजला असून तो सडण्याची भीती निर्माण झाली आहे.

एकीकडे बाजारात कांद्याला अत्यंत कमी दर मिळत असताना दुसरीकडे पावसामुळे साठवलेला कांदा खराब होण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

एका बाजूला हॉटेलमध्ये काजू करीसाठी तीनशे रुपये मोजावे लागत आहेत, पाण्याची साधी बाटली वीस रुपयांना विकली जात आहे, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याच्या घामाने पिकवलेल्या कांद्याला सहा रुपये किलो दरही मिळत नाही, अशी तीव्र भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी तसेच कांद्याला योग्य हमीभाव जाहीर करून दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

## भाजपच्या एस.आय.आर अभियान कार्यशाळेत मतदार यादी शुद्धीकरणावर भर

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१३ मे -**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने भूम-परंडा-वाशी विभागस्तरीय एस.आय.आर अभियान कार्यशाळेचे आयोजन बुधवारी भूम येथे करण्यात आले. यावेळी पक्षाचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना मतदार यादीच्या शुद्धीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले.

एस.आय.आर अंतर्गत मतदार यादीचे सूक्ष्म नियोजन आणि शुद्धीकरण केल्यामुळेच पश्चिम बंगालमध्ये भाजपला अपेक्षेपेक्षा अधिक यश मिळाले. प्रत्येक बूथ प्रमुख आणि जबाबदार कार्यकर्त्यांनी आपल्या प्रभाग व वार्डातील मतदार यादीची काटेकोर पडताळणी करून शुद्धीकरण केल्यास भविष्यात पुन्हा एकदा महाराष्ट्रात भाजपची सत्ता निश्चित राहील, असा विश्वास सुनील राणे यांनी व्यक्त केला.




या कार्यशाळेस सुजितसिंह ठाकूर, अर्चनाताई पाटील, नितीन काळे, दत्ताभाऊ कुलकर्णी, बाळासाहेब क्षीरसागर तसेच अनिल काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संतोष सुपेकर, बाबासाहेब वीर, गणेश खरसडे, राजगुरू कुकडे, लक्ष्मी साठे, समरजीतसिंह ठाकूर, महादेव वडेकर, सुरेश कवडे यांच्यासह तिन्ही तालुक्यातील बूथ प्रमुख आणि एस.आय.आर अभियानातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यशाळेदरम्यान राणी यादव, अतुल नवनाथ शिर्के, प्रशांत परमेश्वर लोखंडे, परमेश्वर ज्ञानोबा लोखंडे, सुनील दशरथ वारे, कुलदीप चांगदेव शिंदे आणि बाजीराव सर्जेराव शेळके यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

यावेळी सुनील राणे यांनी पश्चिम बंगालमधील मतदार पडताळणी प्रक्रियेचा उल्लेख करत सांगितले की, खोट्या मतदारांची छाननी, बाहेरील मतदारांची पडताळणी, मयत आणि डबल मतदारांची नावे वगळण्याचे काम प्रभावीपणे करण्यात आले. त्यामुळेच तेथे भाजपला मोठे यश मिळाले. आगामी काळात महाराष्ट्रातही प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने काम करून मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## गुटखा विक्रीवर कारवाई; ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

येवती येथील एका किराणा दुकानावर नळदुर्ग पोलिसांनी छापा टाकून शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तत्सम पदार्थ जप्त केले.



या प्रकरणी आरोपी विशाल वसंत शिंदे (वय ४१, रा. येवती ता. तुळजापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ११ मे २०२६ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास येवती गावातील विशाल कम्युनिकेशन किराणा स्टोअर्स या दुकानात विमल पान मसाला, डायरेक्टर पान मसाला तसेच सुगंधित तंबाखू असा एकूण ५४ हजार ६११ रुपयांचा माल विक्रीसाठी साठवून ठेवलेला पोलिसांना आढळून आला.

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या पथकाने गुटखा साहित्य जप्त करून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत कामगार ठार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

पेठसांगवी शिवारात एमएसईबीच्या तार दुरुस्तीचे काम करत असताना अज्ञात वाहनाच्या धडकेत एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध लोहारा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मृत व्यक्तीचे नाव कारु मोहन सिंह, वय ५१ वर्षे, रा. चित्रम गोविंदपुर कला ता. विष्णुगड जि. हाजीरीबाग, राज्य झारखंड असे आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २६ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास पेठसांगवी शिवारात एमएसईबी कंपनीच्या तार दुरुस्तीचे काम सुरू होते. यावेळी अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवत कारु सिंह यांना जोराची धडक दिली.

या अपघातात कारु सिंह गंभीर जखमी झाले असून उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित वाहन चालकाने कोणतीही माहिती न देता घटनास्थळावरून पलायन केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## ईट येथे आज ‘छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर’

### एकाच छताखाली १७ हून अधिक शासकीय सेवांचा लाभ...

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१३ मे -**

राज्य महसूल विभागाच्या वतीने ‘छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर’ अभियान टप्पा-१ अंतर्गत भूम तालुक्यातील ईट येथे १४ मे रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जयवंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरात एकाच छताखाली १७ हून अधिक शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना घेता येणार आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामध्ये प्रामुख्याने ७/१२ वरील दुरुस्त्या, फेरफार नोंदी आणि वारस नोंदींचे प्रश्न तत्काळ मार्गी लावले जाणार आहेत. सामाजिक योजनांच्या लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारून त्यांचे आधार सीडिंगही पूर्ण केले जाणार आहे. प्रया शिबिराचा ईट मंडळातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार पाटील यांनी केले आहे. या शिबिरात विविध महत्त्वाची प्रमाणपत्रे वितरित केली जाणार असून शेतकऱ्यांच्या सोयीसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत.

यामध्ये ‘मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना’, भोगवटादार वर्ग-२ जमिनीचे वर्ग-१ मध्ये रूपांतर तसेच अकृषक (एनए) जमिनीसंदर्भातील नवीन नियमांची माहिती नागरिकांना दिली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# दुष्काळाच्या छायेत आशेचा झरा ‘जलतारा’

धाराशिवच्या मातीत दुष्काळ नवा नाहीउन्हाळ्याची चाहूल लागली की गावागावातील विहिरींचा तळ दिसू लागतो, बोअरवेल कोरड्या पडतात,टँकरच्या पाण्यासाठी रांगा लागतात आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पुन्हा एकदा चिंतेचे ढग दाटू लागतात.आकाशात ढग दाटले तरी पाऊस हमखास पडेल याची शाश्वती उरलेली नाही.बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान आणि वर्षानुवर्षे घटत चाललेली भूजल पातळी यामुळे धाराशिवसारख्या दुष्काळी जिल्ह्यासमोर जलसंकट दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे.

अशा परिस्थितीत जलतारा अभियान हे केवळ प्रशासनाचे अभियान न राहता आशेचा नवा किरण ठरत आहे.कारण ही मोहीम फक्त पाणी अडविण्याची नाही,तर भविष्य वाचविण्याची आहे पुढील पिढ्यांच्या अस्तित्वासाठी उभा राहिलेला सामूहिक संकल्प आहे. पाणी म्हणजे केवळ तहान भागविणारे साधन नाही; ते शेतीचे जीवन,जनावरांचा आधार,ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आणि पर्यावरणाचा श्वास आहे.म्हणूनच आज पाणी अडवा,पाणी जिरवा ही संकल्पना घोषणांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची वेळ आली आहे. जलतारा अभियानातून धाराशिव जिल्ह्यात हीच जाणीव लोकांच्या मनामनात रुजताना दिसत आहे.

गावोगावी तलाव,नाले,ओढे,विहिरी आणि शेततळ्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी लोकसहभागातून मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. गाळ काढणे,नाले खोलीकरण,बंधारे उभारणे,वृक्षारोपण, जलस्रोत स्वच्छता आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपक्रमांमुळे अनेक गावांमध्ये सकारात्मक बदल जाणवू लागले आहेत. ज्या विहिरी काही वर्षांपूर्वी एप्रिलमध्येच कोरड्या पडत होत्या,त्या आता अधिक काळ पाण्याने भरलेल्या राहू लागल्या आहेत.काही भागांत भूजल पातळी वाढल्याचेही चित्र दिसून येत आहे.

विशेष म्हणजे या अभियानाने दुष्काळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन




बदलला आहे.पूर्वी पाणीटंचाई आली की फक्त शासनाकडे मदतीची अपेक्षा ठेवली जात होती; मात्र आता गावकरी स्वतः पुढाकार घेत जलसंधारणाच्या कामांत उतरू लागले आहेत.युवकांचे श्रमदान, महिला बचत गटांचा सहभाग, शेतकऱ्यांचे नियोजन आणि सामाजिक संस्थांची साथ यामुळे जलतारा आता लोकचळवळ बनू लागले आहे. धाराशिवसारख्या जिल्ह्यासाठी भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. कारण येथील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा आधार भूजलावरच आहे.पावसाचे पाणी जमिनीत मुरले तरच विहिरी आणि बोअरवेल जिवंत राहू शकतात.त्यामुळे पडणारा प्रत्येक थेंब अडविणे आणि जिरविणे ही आता निवड नसून अपरिहार्यता बनली आहे.

या मोहिमेला अधिक बळ मिळत आहे ते प्रशासन,लोकसहभाग आणि सेवाभावी संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी एक लाख जलतारा तयार करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प जिल्ह्यासमोर ठेवला आहे.

प्रत्येक शेतकरी उत्पादक कंपनी आणि शेतकरी गटाला प्रत्येकी ५०० जलधारा कामांचे उद्दिष्ट देण्यात आले असून,गावागावात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या अभियानात नाम फाउंडेशनसह विविध सामाजिक संस्था सक्रियपणे सहभागी झाल्या आहेत.

नाम फाउंडेशनच्या माध्यमातून जलतारा कामांसाठी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जात आहे.त्यामुळे जलसंधारणाच्या कामांना वेग मिळत असून,भविष्यात जिल्ह्यातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात वाढण्याची आशा निर्माण झाली आहे. त्याचा थेट लाभ शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे.

आजही अनेक शेतकरी अपुऱ्या पाण्यामुळे पिकांचे नुकसान सहन करत आहेत. जनावरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो.अशा वेळी जलसंधारणाची प्रत्येक कृती उद्याच्या संकटावर मात करण्याची ताकद ठेवते. कारण जिथे पाणी टिकते,तिथे शेती टिकते; शेती टिकली की गावाची अर्थव्यवस्था टिकते आणि गाव टिकले की भविष्य सुरक्षित राहते. थेंब थेंब जपला तरच उद्याचा झरा वाहील,जलसंवर्धनाच्या वाटेवरूनच समृद्धीचा सूर्य उगवेल.

जलतारा अभियानाची खरी ताकद म्हणजे त्यातून निर्माण होणारी सामाजिक जाणीव. हे अभियान केवळ जलस्रोत दुरुस्त करण्यापुरते मर्यादित नाही,तर पाण्याबाबत जबाबदारीची संस्कृती निर्माण करत आहे.घरगुती वापरापासून शेतीपर्यंत पाण्याचा योग्य वापर,पुनर्वापर आणि बचत याबाबत समाजात जागरूकता निर्माण होत आहे.

धाराशिवला दुष्काळमुक्त आणि जलसंपन्न बनवायचे असेल,तर जलतारा ही फक्त मोहीम न राहता लोकांच्या मनातील चळवळ बनली पाहिजे.शासन, प्रशासन,सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी हातात हात घालून पुढे आले,तर दुष्काळावर मात करणे अशक्य नाही. कारण आज जपलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करणार आहेआणि कदाचित याच थेंबांतून धाराशिवच्या नव्या समृद्धीची पहाट उगवणार आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्पा सेंटर लाच प्रकरण : कॉल रेकॉर्ड चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ मे -**

कळंब येथील रिलॅक्स स्पा सेंटर प्रकरणात दोन पोलिस अंमलदारांना लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्यानंतर या प्रकरणाचे पडसाद आता अधिक तीव्र होत आहेत.

या प्रकरणात कळंब पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांच्या कॉल रेकॉर्डची चौकशी करण्याची मागणी नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून जोर धरू लागली आहे.

लाचखोरी प्रकरणातील तक्रारीत आरोपी पोलिस कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी पैसे मागितल्याचा उल्लेख असल्याचे समोर आले आहे.

त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

संबंधित पोलीस निरीक्षकांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर), मोबाईलवरील संभाषणे तसेच आरोपी पोलिस कर्मचाऱ्यांशी झालेला संपर्क यांची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे. याशिवाय या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचाही तपास करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून सर्व बाबींची पडताळणी करण्यात येत असल्याची माहिती समोर येत आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### नीट पेपर लिक प्रकरणी एनएसयूआयचे आंदोलन

**भूम, दि.१३ मे -**

नीट युजी २०२६ परीक्षा झाल्यानंतर पेपर लिक झाल्याचे समोर आल्याने विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाल्याचा आरोप करत धाराशिव एनएसयूआयच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, NTA रद्द करण्यात यावी, पेपर लीक प्रकरणातील दोषींवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री उ्हरीशपवीर झीरवहरप यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी धाराशिव एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष ॲड. मुशरफ सय्यद, ॲड. सोहेल शेख, अनिकेत गायकवाड, फय्याज पठाणआदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

### गणेश रोचकरी यांची युवासेना संपर्क प्रमुखपदी निवड

**तुळजापूर, दि.१३ मे -**

युवासेनेच्या संघटन विस्तारासाठी करण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये गणेश देवानंद रोचकरी यांची तुळजापूर



विधानसभा युवासेना संपर्क प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ही निवड जाहीर करण्यात आली. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक डरीपरळज्ञ यांच्या सूचनेनुसार राज्यभर सदस्य नोंदणी व मतदार यादी अद्ययावत अभियान राबवण्यात येत आहे. रोचकरी यांच्या निवडीमुळे तुळजापूर विधानसभा मतदारसंघात युवासेनेचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीचे शिवसेना व युवासेना पदाधिकाऱ्यांकडून स्वागत करण्यात येत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### 'स्व-गणना'ला नागरिकांचा प्रतिसाद

**भूम, दि.१३ मे -**

भारताची जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यात घर यादी, घर गणना व 'स्व-गणना' प्रक्रिया १ मे



ते १५ मे दरम्यान सुरू झाली असून नागरिकांकडून ऑनलाइन नोंदणीला प्रतिसाद मिळत आहे. यंदाच्या जनगणनेत नागरिकांना स्वतःची व कुटुंबाची माहिती ऑनलाइन पोर्टलवर भरता येणार असल्याने प्रक्रिया अधिक सोपी झाली आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना संदर्भ क्रमांक दिला जात असून जनगणना कर्मचारी घरी आल्यानंतर तो क्रमांक दाखवायचा आहे. त्यामुळे माहिती देण्यासाठी जास्त वेळ लागणार नसल्याचे सांगण्यात आले. भूम नगराध्यक्ष संयोगीता गाढवे यांनी नागरिकांनी स्व-गणना पोर्टलवर जाऊन सर्व माहिती अचूक भरून संदर्भ क्रमांक जतन करून ठेवावा, असे आवाहन केले आहे.

### वाहतूक नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.१३ मे -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून दि.१२ मे रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष वाहतूक मोहीम राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात एकूण ३४८ कारवाया करण्यात आल्या. या मोहिमेतून एकूण २ लाख ६३ हजार ९५० रुपये इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

# जलजीवन मिशनच्या रखडलेल्या योजनांवर जि.प.त संताप

## ▶▶ अपूर्ण कामांवरही कोट्यवधींची बिले... ▶▶ घरोघरी पाणी पोहोचेपर्यंत बिल नाही ठराव मंजूर...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत जलजीवन मिशनच्या अर्धवट आणि रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांचा मुद्दा जोरदार गाजला. सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र येत संबंधित अधिकारी व ठेकेदारांच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक गावांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू नसतानाही कोट्यवधींची बिले काढण्यात आल्याचे गंभीर आरोप सभागृहात करण्यात आले.

सभेदरम्यान अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण कामांबाबत अधिकाऱ्यांना फैलावर घेत आक्रमक भूमिका घेतली. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये योजनांची अवस्था गंभीर असून काही ठिकाणी योजना पूर्ण न होता आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू नसतानाही ठेकेदारांची मोठ्या प्रमाणात बिले अदा करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

अचलेर आणि खेड येथील पाणीपुरवठा योजनांचे काम अपूर्ण असतानाही सव्वा कोटी रुपयांच्या निविदेमधून तब्बल एक-एक कोटी रुपयांची बिले काढण्यात आल्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित करण्यात आला. काम अपूर्ण असताना ठेकेदारांची बिले कशी काढली? असा सवाल करत अध्यक्षा पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. यानंतर सभागृहात महत्त्वाचा ठराव मंजूर करण्यात आला. जोपर्यंत नळाद्वारे घरोघरी पाणी पोहोचत नाही, तोपर्यंत कोणत्याही ठेकेदाराचे बील काढू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. जिल्हा परिषद सदस्य शिंदे यांनी मसला गावातील अपूर्ण पाणीपुरवठा योजनेचा मुद्दा उपस्थित केला. नवीन योजनेचे तब्बल ८५ टक्के बिल काढण्यात आले असतानाही गाव आजही जुन्याच योजनेवर अवलंबून असल्याचा आरोप त्यांनी केला. या योजना पुढील ३० वर्षांच्या लोकसंख्येचा विचार करून राबवल्या जात असल्याने एकदा योजना मंजूर झाल्यानंतर पुन्हा नवीन योजना मिळत नाही. त्यामुळे योजना अपूर्ण राहिल्यास भविष्यात गावकऱ्यांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत सभागृहाने पुढील देयके रोखण्याचा निर्णय घेतला.

### पावणेदोनशे गावांत स्टडी हॉल आणि स्वच्छतागृहे

पंधराव्या वित्त आयोगातून प्राप्त झालेल्या सुमारे ४२ कोटी रुपयांच्या निधीतून जिल्ह्यातील सुमारे पावणेदोनशे गावांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्टडी हॉल आणि स्वच्छतागृहे उभारण्याचा निर्णयही सभेत घेण्यात आला. या विषयावर चर्चा होत असताना सदस्या कांचनमाला संगवे यांनी निधीचे समान वाटप व्हावे आणि सदस्यांना कामे निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे, अशी भूमिका मांडली. त्यानंतर सभागृहात काही काळ गदारोळ झाला. मात्र, स्टडी हॉल आणि स्वच्छतागृह उभारणीला सर्व सदस्यांनी समर्थन दर्शवले. यावेळी अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी निधीचे समान वाटप करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. तसेच अधिग्रहणाच्या थकीत १९ लाख रुपयांच्या बिलाचा मुद्दाही सभागृहात उपस्थित करण्यात आला. संबंधित थकबाकी तातडीने मिळावी, अशी मागणी करण्यात आली असून त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यापुढे निधी वर्ग करण्यापूर्वी संबंधित गावाचे सरपंच, ग्रामसेवक आणि गट-गण सदस्यांच्या स्वाक्षरीचे पत्र घेणे बंधनकारक करण्याची सूचना करण्यात आली. तसेच योजना कार्यान्वित झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागाला देण्यात आले.

सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर, उपाध्यक्षा उषा गायकवाड, सभापती विश्वास कोकणे, भाऊसाहेब खरसडे, पूजा शिंदे, सिद्धेश्वर कोरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम भालके यांच्यासह सर्व सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

## मोडकळीस आलेल्या जि.प. शाळांची दुरुस्ती करा : डॉ. प्रतापसिंह पाटील




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळा अत्यंत जीर्ण व मोडकळीस आलेल्या अवस्थेत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तात्काळ दुरुस्ती व आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील अनेक शाळांच्या वर्गखोल्या, छत, भिंती व इतर बांधकामे अत्यंत खराब अवस्थेत आहेत. अनेक ठिकाणी छत गळत असून भिंतींना मोठे तडे गेले आहेत. काही शाळांच्या इमारती कधीही कोसळण्याच्या स्थितीत असल्याने विद्यार्थी जीव मुठीत धरून शिक्षण घेत आहेत. शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क असून सुरक्षित वातावरणात शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व जीर्ण शाळांची तात्काळ तांत्रिक तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती, पुनर्बांधणी अथवा नवीन इमारती उभारण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच अतिधोकादायक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पर्यायी सुरक्षित व्यवस्था करावी, दुरुस्ती



व पुनर्बांधणीसाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## बस प्रवासादरम्यान महिलेच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

जालना ते सोलापूर बसने प्रवास करत असताना एका महिलेच्या बॅगेतील सुमारे २ लाख १० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादी स्वाती विकास गवळी, वय ३८, रा. चाटे गल्ली, राम मंदिर शेजारी, मोहळ या दि. ११ मे २०२६ रोजी सकाळी ११.१५ ते ११.३० वाजण्याच्या सुमारास जालना ते सोलापूर बसमधून प्रवास करत होत्या.

दरम्यान, संबंधित बस कुंथलगिरी फाटा येथे जेवणासाठी थांबली असता फिर्यादी, त्यांची बहीण आणि आई या वॉशरूमसाठी खाली उतरल्या. यावेळी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या बॅगेतील ३५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरी करून नेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

चोरीस गेलेल्या दागिन्यांची किंमत सुमारे २ लाख १० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

## तरुणीचे अपहरण करून रोख रक्कम व दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मे -**

तुळजापूर तालुक्यातील एका १९ वर्षीय तरुणीला चाकूने भोसकून टाकण्याची धमकी देत मारहाण करून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने लुटल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलिस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपी अभिषेक दिलीप जाधव आणि सोन्या जाधव, दोघे रा. लिंबाळा (दै) तांडा ता. औसा जि. लातूर असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.६ मे २०२६ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास हलदरा तांडा होर्टी शेत परिसरात फिर्यादी स्वाती शुभम चव्हाण, वय १९, रा. हावलदरा तांडा होर्टी ता. तुळजापूर यांना आरोपींनी अडवले. यावेळी तुला चाकूने भोसकून टाकू अशी धमकी देत त्यांना हाताने मारहाण करण्यात आली. त्यानंतर फिर्यादीकडील रोख रक्कम १ लाख ३० हजार रुपये तसेच १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण सुमारे ६ लाख रुपयांचा ऐवज आरोपींनी जबरदस्तीने घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. फिर्यादी आरडाओरडा करू नये म्हणून आरोपींनी तिला त्यांच्या गाडीतून घेऊन जाऊन तिच्या मामाच्या घरासमोर सोडून दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी नळदुर्ग पोलिसत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## बोरामणी तिहेरी हत्याकांडातील आरोपीला अटक

### अणदूरचे उपनिरीक्षक महेश घोडके यांच्या कामगिरीचे कौतुक...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१३ मे -**

अणदूरचे सुपुत्र तथा महेश घोडके आणि त्यांच्या टीमने संपूर्ण राज्याला हादरवून सोडणाऱ्या बोरामणी येथील म्हस्के कुटुंब तिहेरी हत्याकांडातील आरोपीला मोठ्या शिताफीने अटक करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या धाडसी कारवाईबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सोलापूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील बोरामणी येथे शेती व संपत्तीच्या वादातून एका दीराने आपल्या वहिनी व दोन पुतण्यांवर तलवारीने सपासप वार करून निर्घृण खून केला होता. या तिहेरी हत्याकांडातील मुख्य आरोपीला कौशल्यपूर्ण आणि तांत्रिक तपासाच्या आधारे हसनाबाद, जिल्हा उत्तर २४ परगणा, राज्य पश्चिम बंगाल येथील भारत-



बांगलादेश सीमेवरून अटक करण्यात महेश घोडके व त्यांच्या टीमला यश आले. अवघ्या काही दिवसांत फरार आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आल्याने या कारवाईचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. उत्कृष्ट कामगिरीबद्दल विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी तसेच पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन महेश घोडके व संपूर्ण टीमचा गौरव करण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर तसेच पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे उपस्थित होते.

कर्तव्यदक्ष आणि धाडसी पोलिस अधिकाऱ्यांची आज समाजाला गरज असून, महेश घोडके यांच्या या कामगिरीमुळे त्यांची कर्मभूमी असलेल्या अणदूर गावाला सार्थ अभिमान वाटत असल्याच्या भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

## धाराशिव जिल्ह्यात लव्ह जिहादसारखाच धक्कादायक प्रकार उघड!...

# खोटे नाव, धर्मांतर, अत्याचार, धाराशिव जिल्ह्यातील कला केंद्रे पुन्हा चर्चेत

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ मे -**

धाराशिव जिल्ह्यातील एका विवाहित महिलेला खोटे नाव सांगून प्रेमसंबंध जुळवणे, ब्लॅकमेल करून जबरदस्तीने लग्न करणे, मुस्लिम धर्म स्वीकारण्यास भाग पाडणे तसेच विविध कला केंद्रांमध्ये मारहाण करत नाचकाम करण्यास भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी खडक पोलिस ठाणे येथे झिरो क्रमांकाने गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास धाराशिव पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिचे लग्न झालेले असून तिला दोन मुले आहेत. कौटुंबिक वादामुळे ती आई-वडिलांकडे राहत होती.

२०२३ मध्ये कुटुंबासह पुणे येथे कामासाठी गेल्यानंतर शिक्रापूर परिसरातील एका कंपनीत काम करत असताना तिची 'मुस्कान' नावाच्या महिलेशी ओळख झाली. कमी पगारात उदरनिर्वाह होणार नसल्याचे सांगत मुस्कानने तिला धाराशिव येथील गौरी कला केंद्रात नेले. तेथे तिला डान्स करण्यास भाग पाडण्यात आल्याचा आरोप आहे.

याच काळात 'राजू' नाव सांगणाऱ्या एका तरुणाशी तिची ओळख झाली. त्याने जवळीक वाढवत अनेक वेळा शारीरिक संबंध ठेवले. कळंब येथील लॉजसह विविध ठिकाणी नेऊन तिचे फोटो व व्हिडिओ काढण्यात आले.



त्याच आधारे लग्नासाठी दबाव टाकण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

संबंधित आरोपीचे खरे नाव सर्फराज अलीम मोमीन असल्याचे नंतर समोर आले. त्याने महिलेला वाशीम जिल्ह्यातील डिग्रस येथे एका मौलानाकडे नेऊन धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचा आरोप आहे.

नमाज व कलमा पठण करण्यास भाग पाडत तिचे नाव बदलून 'जोया' ठेवण्यात आले. महिलेला बुरखा परिधान करण्यास भाग पाडण्यात आले तसेच हातावर मुस्लिम धर्माशी संबंधित टॅटू काढण्यासही सक्ती करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

महिलेच्या तक्रारीनुसार, आरोपीने वारंवार मारहाण, शिवीगाळ व मानसिक छळ केला. बैलाचे मटण जबरदस्तीने खाऊ घातल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

आरोपीविरुद्ध अनेक गुन्हे नोंद असल्याचे सांगत तो बाहेर फिरत नसल्याचेही महिलेला सांगण्यात आले होते.

यानंतर आरोपीने महिलेला बीड जिल्ह्यातील मांजरसुंबा येथील 'जगदंबा' कला केंद्रात नेले. तेथे मारहाण करून काम करण्यास भाग पाडण्यात आले. पुढे महाकाली कला केंद्र, संभाजीनगर येथील थापीदंडा कला केंद्र अशा विविध ठिकाणी महिलेला नेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. पळून जाण्याचा प्रयत्न केल्यावर तिला पुन्हा पकडून आणणे, धमक्या देणे, तलवारीने हल्ल्याचा प्रयत्न करणे असे गंभीर आरोपही करण्यात आले आहेत.

तसेच इतर मुलींनाही या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप पीडितेने केला आहे. संभाजीनगर येथे पोलिसांत तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता आरोपी तेथे येऊन अडथळा आणत असल्याचाही दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ३५१ (२), ३५२, ६४, ६४ (२) (I) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सर्फराज अलीम मोमीन हा कळंब येथील रहिवासी असल्याचे समोर आले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील बंद पडलेल्या कला केंद्रांमधील महिलांवर झालेल्या अत्याचारांची प्रकरणे आता एकामागोमाग समोर येत असल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात आणखी पीडित महिला आहेत का, याचा शोध घेण्याची मागणी होत आहे.